स्थायी समितीच्या शुक्रवार दिनांक 12–05–2017 रोजी दुपारी 03–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. संदिप चंद्रभान जाधव | सभापती |
| 2. | श्रीमती संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 3. | श्रीमती रिता अशोक मुळे | सदस्या |
| 4. | श्रीमती उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 5. | श्रीमती दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 6. | श्रीमती नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 7. | श्रीमती मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 8. | श्रीमती लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 9. | श्रीमती जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 10. | श्री. जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 11. | श्री. हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| 12. | श्रीमती अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |
| 13. | श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्रीमती भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 2. | श्रीमती सरला कमलेश नायक | सदस्या |
| 3. | श्रीमती सरिता ईश्वर कावरे | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. रामनाथ सोनवणे, अति. आयुक्त
2. श्री. रविन्द्र कुंभारे, अति. आयुक्त
3. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 30ः– {सा.प्र.वि.} नागपुर महानगर पालिकाचे विविध विभाग व क्षेत्रीय कार्यालयामध्ये असलेली मालमत्ता व इमारतीची देखरेख व सुरक्षेच्या दृष्टीने कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेल्या खाजगी सुरक्षा रक्षक ऐजन्सी ऐवजी सुरूवातीला प्रायोगीक तत्वावर (01.05.2017 ते 31.10.2017) सहा महिन्याचे कालावधीकरीता नागपुर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाचे किमान वेतन अधिनियम, 1948 अंतर्गत दुकाने व व्यापारी आस्थापना मधील कामगारांना लागु असलेले किमान वेतन दर प्रमाणे व त्यानुसार सदर अनुसुचित उद्योग–धंद्यामधील कामगारासाठी शासनातर्फे वेळोवेळी जाहीर होणारा विशेष भत्त्यानुसार मासीक वेतन रू 19109.04 (सेवाकर रू 2866.36 सोडुन ) व पर्यवेक्षकाचे दर रू 20819.97 (सेवाकर रू 3123 सोडुन ) प्रमाणे ई–निविदा न बोलावता नागपुर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ नागपुर यांना बिना बंदुकधारी सुरक्षा रक्षकांचा व पर्यवेक्षकाचा पुरवठा करणेस मंजुर करण्याचा

प्रश्न विचारात घेणे व नागपुर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांना आदेश निर्गमित होइपर्यत कार्यरत खाजगी सुरक्षा रक्षक ऐजन्सींना मुदतवाढ देण्याबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन नागपूर जिल्हा सुरक्षा मंडळ यांनी म.न.पा. प्रशासना बरोबर करारनामा करावा, यांना आदेश निर्गमित होईपर्यंत कार्यरत खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सींना तीन महिन्याची मुदतवाढ देण्यात येत आहे. या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 31ः— प्रभाग क्र. 72 मध्ये अहिल्यानगर येथील रस्त्यांचे सिमेंटीकरण {कार्य. अभि. प्रकल्प} करण्यास्तव रु. 34,99,120/— रकमेच्या शासकीय (खासदार निधी) अंतर्गत करावयाच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी प्राकलनीय 10.98 टक्के कमी दरावर रु. 34,99,120/— ची मे. श्रीपाद कन्स्ट्रक्शन यांची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 32ः— ‘‘दि आउटडोअर ॲडव्हरटायजिंग पॉलीसी २००१ {जाहिरात विभाग} (सुधारीत २०१०) आजच्या तारखेस आकारण्यात येणाऱ्या शुल्कामधे २५ टक्के वाढ करण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषय एकमताने मंजूर, धोरणात्मक निर्णय असल्यामुळे व यापूर्वी म.न.पा. सभागृहानी या प्रस्तावास मान्यता प्रदान केली असल्यामुळे अंतिम मंजुरीस्तव म.न.पा. सभागृहाकडे पाठविण्याची शिफारस करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

| Sr. No. | | Description | Scale of fees Per Month | Rate | New Rate |
|---|---|---|---|---|---|
| 1 | a | Advertisements on hoarding or wall posts or in the form of illuminated & non illuminated sky - signs. | For a space up to 1 sq. mtr. | 17.5 | 22.00 |
| | | | For every additional sq. mtr. or less | 17.5 | 22.00 |
| | b | If the above advertisements project over or across streets. | For every mtr. | 17.5 | 22.00 |
| | c | Advertisements fixed or suspended in streets or on footpaths in connection with the charitable or educational object for a period not exceeding fifteen days. | Rates as shown in item 1 (a) | | |
| 2 | a | Advertisement fixed or suspended in streets or footpaths | For a space up to 1 Sq. mtr | 15.00 | 19.00 |
| | | | For every additional sq. mtr or less. | 15.00 | 19.00 |
| | b | If the above advertisements project over or across streets. | For every mtr. | 26.5 | 33.00 |
| | c | Advertisement hoarding standing blank "but bearing the name of the advertiser or with the announcement to be let displayed there on. | 0.81 paisa per sq. mtr. Per month | 9.4 | Delit |
| 3 | a | Advertisement boards carried on vehicle | For a space up to 2 sq. mtr. | 35 | 44.00 |
| | | | For every additional sq. mtr or less. | 35 | 44.00 |
| | b | Loose poster which are posted or fixed on walls, roads or suspended in streets, etc. | 3.5 rupee per poster irrespective or the size but such posters must bear facsimile of an officer authorized by the corporation in this behalf. Posters without facsimile will be treated as unauthorized. But posters posted on hoardings or wall posters shall be charged at rate shown in item no. l(a) | | |
| 4 | | Illuminated advertisement boards carried on vehicle. | For a space up to 2 sq. mtr. | 62.5 | 78.50 |
| | | | For every additional 2 sq. mtr. or less | 62.5 | 78.50 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 5 | | Advertisement boards carried by sandwich board men etc. | For each board not exceeding 1 sq.mtr. | 17.5 | 22.00 |
| | | | For every additional sq. mtr or less | 17.5 | 22.00 |
| 6 | | Illuminated advertisement boards, etc carried by sandwich board men. | For each board not exceeding 1 sq. mtr | 35 | 44.00 |
| | | | For every additional sq. mtr. or less. | 35 | 44.00 |
| | | | For every additional 0.5 sq.mtr. | 70.00 | 92.50 |
| | | | For every additional sq. mtr. or less. | 35 | 46.00 |
| 7 | a | For fixed illuminated sky-signs and advertisements. | For a space up to 0.2 sq.mtr. | 9 | 12.50 |
| | | | For every additional 0.2 sq. mtr. | 9 | 12.50 |
| | b | Advertisements on hoarding or wall posts illuminated by different means. | Rate shown in item 7 (a) above | | |
| 8 | | For illuminated sky - signs and advertisements exhibited on screens by means of lantern, neon, slides or similar devices. | For a space to 0.5 sq.mtr | 70.00 | 88.00 |
| | | | For every additional 0.5 sq.mtr. | 70.00 | 88.00 |

विषय क्रमांक 33ः— शासकिय अनुदाना अंतर्गत पश्चिम विधान सभा क्षेत्रात {लोककर्म झोन क्र. 4} मुलभूत सोई सुविधांचा विकास कामा करीता प्रभाग क्र. 8 अ, अनंतनगर, स्वागतनगर, भूपेशनगर व इतर ठिकाणी रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी में. एस. के. जी. असोसिएेट हयांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 0.0100 टक्के कमी दराची निविदा रूपये 87,57,446/–(रूपये सत्यांशी लक्ष सत्तावन हजार चारशे छेहचाळीस रूपये फक्त ) स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 34ः— नागपूर उत्तर मतदार क्षेत्रातील हमीदनगर येथे वांजरा {लोककर्म झोन 09} रेल्वे क्रॉसिंग ते म्हाडा कॉलोनी ते कामठी नाका नं 2 पर्यंत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. ऐस. के. गुरूबक्षाणी यांची प्राकलनीय दरावरील राशी रु. 2,49,99,975/– निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली. हे काम शासकीय अनुदान (महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सुखसोयींच्या विकासासाठी विशेष तरतूद) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 35ः— {कारखाना विभाग} नागपूर शहरातील मुख्य नद्यांचे (नाग नदी, पीवळीनदी व पोहरा नदी) स्वच्छता अभियान (2017—2018) साठी विविध खाजगी शासकीय तथा निमशासकीय संस्थे व्दारे प्राप्त झालेल्या व उपयोगात आलेल्या विविध मशिनरी (उदा. पोकलेन, जेसिबी, टिप्पर) करीता, अपेक्षित असलेल्या इंधन पुरवठयाचा अंदाजीत खर्च रु. 40.00 लक्ष राशीच्या प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 36ः— {उद्यान विभाग} अंबाझरी ओव्हरफ्लो पॉइंट येथील स्वामी विवेकानंद नागपूर महानगरपालीका तर्फे तयार करण्यात आले असून या स्मारकाचे संचालन व पूढील देखभाल रामकृष्ण मठातर्फे करण्याचे प्रस्तावित आहे. उक्त स्मारकाचे विद्युत व पाणी बिल मनपा वहन करेल तसेच स्मारकाचे प्रस्तावित प्रवेश शूल्क उत्पन्न वसूली अधिकार रामकृष्ण मठ संस्थेस राहील, संस्था स्मारकापासून होणारे उत्पन्न व खर्च एका खात्यामधून करतील व त्याचे लेखापरीक्षण करून दरवर्षी मनपाला सादर करतील या अटीसह दहा वर्ष कालावधी साठी देखभाल व संचालन करिता देण्याचा प्रश्न विचारार्थ सादर.

मा. स्थायी समिती मान्यतेनंतर प्रस्ताव मा. सभागृहाच्या मंजूरीकरिता पाठविण्यात येईल.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 37:— नव्याने म.न.पा. हद्वाढ मौजा नरसाळा — हुडकेश्वर {कार्यकारी अभि. झोन 3} करीता पावसाळी पाण्याच्या (Strom water) योग्य रीतीने निचराच्या दृष्टिने विस्तृत प्रकल्प अहवाल (Detail Project Report) तयार करण्याबाबत व या अंतर्गत घेण्यात येणा—या प्रकल्पावर प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागाराची (Project Management Consultant) नियुक्ती करीता या आधी मा. स्थायी समिती द्वारे मंजूर ठराव क्रं. १४७, दि. १३.०५.२०१६ अन्वये सल्लागार M/s. DRA Consultant Pvt.Ltd, Nagpur. यांची नियुक्ति खालील प्रमाणे मंजुर निविदा दरावर करण्यात आली असून त्याची Project Management Consultant म्हणून नियुक्ती करण्याचे तसेच या प्रकल्पाकरीता येणारा Consultancy fee चा खर्च म.न.पा.च्या प्रस्तावित अर्थसंकल्प २०१७—१८ तील पद क्र. A42001374602 मधून तरतुद मुक्त करण्याचे प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

A) Consultancy Services for Preparation of Detail Project report (DPR) & Pre Tender Activity :-

| Sr. No | Description | Base cost | Fees in % Base Cost | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | Project Cost (In Crores) | In% | Min Fees (In Lakhs ) | Fees Payable to the consultant. |
| 01) | "Consultancy services for Preparation of detail Project Report(DPR) and Pre-Tender Activity for Storm Water Drainage System of Hudkeshwar & Narsala of Nagpur City " | Total Accepted cost of the Project. | Rs.0.00 to 2.50 | 2.00% | ---- | ---- |
| | | | Rs.2.50 to 5.00 | 1.75% | 5.00 | Rs.5.00 lakhs or 1.75% of the project cost whichever is more |
| | | | Rs.5.00 to 10.00 | 1.50% | 8.75 | Rs8.75 lakhs or 1.50% of the project cost whichever is more |
| | | | Rs.10.00 to 25.00 | 1.00% | 15.00 | Rs.15.00 lakhs or 1.00% of the project cost whichever is more |
| | | | Rs.25.00 to 50.00 | 0.75% | 25.00 | Rs.25.00 lakhs or 0.75% of the project cost whichever is more |
| | | | Rs.50.00 to 75.00 | 0.60% | 37.50 | Rs.37.50 lakhs or 0.60% of the project cost whichever is more |
| | | | Rs.75.00 to 100.00 | 0.50% | 45.00 | Rs.45.00 lakhs or 0.50% of the project cost whichever is more |
| | | | More than Rs.100.00 | 0.50% | 50.00 | 0.50% |

B) Project Management Consultant (PMC)

| Sr. No. | Item | Unit | Quoted rate in Percentage of approved cost |
|---|---|---|---|
| 1 | "Project Management consultant (PMC)for storm Water Drain System of Hudkeshwar & Narsala at Nagpur City" | % of the approved cost of work | 3%(Three Percent only |

Note :- All above rates (A & B) are inclusive of all the Taxes, Duties & Insurance, Statutory payments required for the assignments. Only Service Tax shall be paid extra over and above the Consultancy Charges at the Rate and as per the Statutory Rules made applicable by Government from time to time.

ठराव क्रमांक 38:— राज्य सरोवर संवर्धन योजने अंतर्गत गांधीसागर तलाव येथे {पेंच प्रकल्प कक्ष} शौचालय बांधण्यात आले होते. त्याचे काम अर्धवट स्थितीत असल्यामुळे व प्रकल्पाचे कामाचे व्याप्ती मध्ये बदल झाल्यामुळे उर्वरीत काम म.न.पा. द्वारे करावयाचे होते.

शौचालयाचे काम पूर्णत्वाकडे नेण्याकरीता म.न.पा. द्वारा नामीत एजन्सीची नियुक्ती करण्यात आली असून पूढील काम करण्यास्तव प्रस्तावीत एजन्सी ओम शिवा सॅनीटेशन सोशल सर्व्हीसेस, सिकंदराबाद, ब्रॅन्च ऑफीस सादीकाबाद कॉलोनी नागपूर यांनी स्वारस्य दर्शविलेले आहे. या प्रकरणामध्ये (काम पूर्ण करण्यास्तव) साधारणतः 10.0 लक्ष रुपयाचा खर्च असून एजन्सी स्वखर्चाने

बांधकाम पूर्ण करण्यात तयार आहे. फक्त जागा एजन्सीला 30 वर्षाकरीता हस्तांतरीत करावयाची असून जागेची मालकी व बांधकाम म.न.पा. चे मालकीचे राहणार आहे. तसेच म.न.पा. ला कुठलाही खर्च करावयाचा नसून रकमेची परतफेड सुद्धा करावयाची नाही. एजन्सी प्रचलीत शुल्क सेवा दरावर (म.न. पा. स्थायी समीती ठराव क्र. 80 दि. 01.06.2015 अन्वये) शौचालयाचे 30 वर्षापर्यंत देखभाल करणार आहे.

स्थायी समिती ठराव क्र. 80 दि. 01.06.2015 अन्वये एकूण पंधरा संस्थांना नामीत करण्यात आलेले आहे. त्या यादीतील अनुक्रमांक 4 वरील "ओम शिवा सॅनीटेशन सोशल सर्व्हीसेस, सिकंदराबाद, कॉलोनी मानकापूर नागपूर" या संस्थेला सदर्हु काम "बांधा, वापरा व हस्तांतरीत करा" या तत्वावर बांधकाम करण्याकरीता व जागा हस्तांतरीत करून 30 वर्षा करीता देखभालीसाठी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 39:— {आरोग्य विभाग} नागपुर शहरातील सार्वजनिक शौचालये व मुत्रीघरे (पक्के व फायबर) यांची यांत्रिकी पध्दतीने साफ—सफाई करण्यासाठी स्थायी समिती ठराव क्रमांक १३६ दिनांक ३१/०७/२०१५ अन्वये दोन वर्षाच्या कालावधीकरीता निविदा मागविण्यात आल्या त्यामध्ये तीन निविदा प्राप्त झाल्या असुन निम्मतम दर में. ब्रिक्स इंडिया प्रा. लि यांचे दहा झोन करीता खालील निम्मतम दर प्राप्त झाले.

Amount Details Yearly

| Zone | FRP Urinals Cleaning and Cement | | Public Toilets | | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| | Unit (Seats) | Amount | Unit (Seats) | Amount | |
| Zone-1 | 12 | 3,48,384 | 12 | 2,54,940 | 6,03,324 |
| Zone-2 | 45 | 13,06,440 | 32 | 6,79,840 | 19,86,280 |
| Zone-3 | - | - | 53 | 11,25,985 | 11,25,985 |
| Zone-4 | 105 | 30,48,360 | 313 | 66,49,685 | 96,98,045 |
| Zone-5 | 18 | 5,22,576 | 23 | 4,88,635 | 10,11,211 |
| Zone-6 | 54 | 15,67,728 | 147 | 31,23,015 | 46,90,743 |
| Zone-7 | 53 | 15,38,696 | 284 | 60,33,580 | 75,72,276 |
| Zone-8 | 43 | 12,48,376 | - | - | 12,48,376 |
| Zone-9 | 18 | 5,22,576 | 41 | 8,71,045 | 13,93,621 |
| Zone-10 | 57 | 16,54,824 | 229 | 48,65,105 | 65,19,929 |
| Grand Total | 405 | 1,17,57,960 | 1,134 | 2,40,91,830 | 3,58,49,790 |

सदर मंजुर निविदा दर वार्षीक एकुण रुपये ३,५८,४९,७९०/— खर्च अपेक्षित राहील. सदर मंजुर दर दोन वर्षा करीता मान्य राहील. यावर होणारा खर्च आय—व्यय पद क्रमांक A24101231701 मधुन भागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 40:— शासकिय अनुदाना अंतर्गत पश्चिम विधान सभा क्षेत्रात {लोककर्म झोन क्र. 4} मुलभूत सोई सुविधांचा विकास कामा करीता प्रभाग क्र. 7 ब, झिंगाबाई टाकली येथील श्रीराम बॅक जनता हार्डवेअर गोधणी रोड येथे पावसाळी नालीचे काम करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी में. एस. के. चरडे हयांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 11.45 टक्के कमी दराची निविदा रूपये 35,41,147/- ( रूपये पसतीस लक्ष ऐक्येचाळीस हजार ऐकशे सत्तेचाळीस रूपये फक्त ) स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 41:— {लोककर्म झोन 05} प्रभाग क्र. ६१ गोपाल कृष्ण लेआउट नरसाळा रोड येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण पाच निविदाकाराची निविदांपैकी मे. अंमृता कन्ट्रक्शन यांची प्राक्कलनीय दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. ४९,९७,०९९/— रकमेची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 42ः— {लोककर्म झोन 05} प्रभाग क्र. ६१ गजानन नगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव एकूण प्राप्त पाच अर्हताप्राप्त निविदांपैकी मे. अमृता कंस्ट्रक्शन यांची प्रशासकीय दरापेक्षा २ टक्के अधिक दराची प्रथम निमित्तम निविदा आहे. मे. अमृता कंस्ट्रक्शन सदरील काम प्राकलनीय दरावर करण्यास सहमती दिली असल्याने, त्यांची प्राकलनीय दराची निम्नतम रू. ४३,९५,११४/— रकमेची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 43ः— {हॉट मिक्स विभाग} मनपा हॉट मिक्स प्लॅन्ट परिसरामधील भंगार साहित्य (scrap), ड्रम्स, टायर्स व वापरात नसलेल्या मशिनरी निर्लेखन करून विक्री करण्याकरीता शासकीय मान्यताप्राप्त मुल्यांकनकार मे. एम.जी. चांडक यांनी मुल्यांकन केल्यानुसार प्रत्येक साहित्यबाबींकरीता खालील प्रमाणे आकारण्यात आलेल्या एकूण रू. 957500/— (रू. नऊ लक्ष सत्तावन्न हजार पाचशे फक्त) किमतीच्या प्रस्तावास मान्यता देणे तसेच त्याकरीता बाबनिहाय दर निविदा मागविण्यास अनुमती देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

| Sr. No. | PARTICULARS | QUANTITY | Offset Rate | Offset Value in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Old Hot Mix Plant with its all accessories (10 Tons Approx) Excluding Shade. | 1 Lot | Rs.1,25,000/- | 1,25,000.00 |
| 2 | Old M.S. shade (Approx.15000 kg) | 15000 kg | Rs.10/- per kg | 1,50,000.00 |
| 3 | F.E. Loader machine make-HM | 1 No | Rs.1,00,000/- | 1,00,000.00 |
| 4 | Old steam roller (Antique category) | 1 No | Rs.1,00,000/- | 1,00,000.00 |
| 5 | Vehicle / Machine scrap parts | 11000 kg. approx | Rs.14/- per kg | 1,54,000.00 |
| 6 | Tyres, Tubes, Tyres Size 10.00 X 20 – 125 Nos,<br>Tyres Size 12.5 X 18 – 07 Nos<br>Tyres Size 14.00 X 25 – 09 Nos<br>Tyre Size 7.00 X 16 - 04 Nos<br>147 Nos | 3.5 tons approx | Rs.03/- per kg | 10,500.00 |
| 7 | M.S. Drum | 125 Nos. | Rs.40/- Each | 5,000.00 |
| 8 | Plastic Drum | 2400 No. | Rs.70/- Each | 1,68,000.00 |
| 9 | Iron water tanks (02 No) Cap. 10000 lit. 01 No., Cap. 4000 lit. 01 No. (Approx.2000kg) | 1 Lot | Rs.25,000/- (wholesome) | 25,000.00 |
| 10 | Building material including m.s. angles, m.s. pipe, iron grill, gate, sheet, etc. (Approx.12000 kg) | 12000 kg | Rs.10/- per kg | 1,20,000.00 |
| | | | Total | 9,57,500.00 |

श्री.मनोज सांगोळेः— मा.सभापती महोदय, आजच्या सभेत स्टार बस आणि ओ.सी. डब्लु. या विषयावर चर्चा करावयाची आहे. परंतु या विभागाचे कोणतेही अधिकारी सभेत उपस्थित झाले नाही. ओ.सी.डब्लू.ने शहरात मोठमोठे खड्डे खोदून ठेवले आहे. तसेच त्यांचे कर्मचारी टाकीवर आमच्या मतदाराला मारझोड करतात तरीही गुन्हा दाखल होत नाही. सुगत नगरच्या टाककीवर असे प्रसंग वारंवारं घडत असतात. ओ.सी.डब्लू.च्या आधी आपले कर्मचारी उन्हात काम करीत होते. ओ.सी. डब्लू.चे कर्मचारी एसी रूममध्ये बसुन कामे करीत असतात. परिवहन आणि ओ.सी. डब्लू.च्या अधिका—यांना पुढच्या वेळेस स्थायी समितीच्या सभेत उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात यावे.

सभापतीः— पुढच्या स्थायी समितीच्या बैठकीत ओ.सी.डब्लू आणि स्टार बस च्या अधिका—यांनी उपस्थित राहावे.

श्री.जितेंद्र घोडेस्वारः– मा.सभापती महोदय, आऊटर रिंग रोडचे काम सुरू आहे. त्या आऊटर रिंग रोड लागून माझ्या प्रभागाची रचना आहे. प्रभागाचा उतार खाली आहे आणि पावसाळी नाल्याची कनेक्टिव्ही वरती आहे त्यामुळे अनेक नाल्या तुंबलेल्या आहेत. तसेच पावसाळयाच्या दिवसात वस्तीत पाणी येवू शकते. ड्रेनेज नाल्या साफ करण्याच्या संदर्भात विभागाकडून काय उपाययोजना करण्यात येणार आहे. त्या ठिकाणी सिमेंट रोडचे काम सुरू असल्यामुळे माझ्या प्रभागात पावसाचे पाणी येवू शकते याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. ड्रेनेज कनेक्टिव्हीच्या संदर्भात काय सुचना आहेत.

श्री.तालेवार(अधिक्षक अभियंता):–मा.सभापती महोदय, ज्या रस्त्याचा उल्लेख मा.सदस्यांनी केलेला आहे. तो आऊटर रिंग रोडचा भाग आहे. त्या ठिकाणी विकास कामे सुरू आहेत. तो सार्वजनिक विभाग बांधकामाच्या अंतर्गत येत असल्यामुळे तेथील कामे त्यांच्याकडे आहेत. ड्रेनेज आणि इतर बाबीं ज्या आहेत. यापूर्वी पावसाळी नाल्याचे साफसफाई हेल्थ विभागाकच्या माध्यमातून करीत होतो त्याप्रमाणे त्यांना सुचना कराव्या लागतील.

श्री.मनोज सांगोळेः– मा.सभापती महोदय, शहरामध्ये जे सिमेंट रोडचे काम सुरू आहे. ऑटोमोटीव्ह चौक ते जरीपटका पोलीस स्टेशन या रस्त्यावर जे डिसेलटींगचे कामे सुरू आहे. तेथील मटेरियल एका ठिकाणाहून दुस–या ठिकाणी फेकण्यात येते. याकरिता मुख्य अभियंता, निगम आयुक्त व पी.डब्लू.डी.ची संयुक्त बैठक लावण्यात यावी.

श्री.जितेंद्र घोडेस्वारः– मा.सभापती महोदय, ऑटोमोटीव्ह चौक ते जरीपटका पोलीस स्टेशन या रस्त्यावर जे डिसेलटींगचे काम सुरू आहे त्याचप्रमाणे प्रभाग 6 मध्ये सुध्दा अडचण आहे. नाले कनेक्टिव्हीचे काम करून घेतले तर बरे होईल.

श्री.तालेवार(अधिक्षक अभियंता):–मा.सभापती महोदय, पेच टप्पा 1 व पेंच टप्पा 2 मध्ये जी कामे सुरू आहेत ते शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरू आहेत. त्या ठिकाणी डिसेलटींग काढण्याचे कामे सुध्दा अंतर्भुत करण्यात आले आहे.

सभापतीः– मा.सभापती महोदय, मा.सदस्य जितेंद्र घोडेस्वार व मा.सदस्य श्री.सांगोळे यांनी जे प्रश्न उपस्थित केले आहे त्याठिकाणी रस्त्यामध्ये ड्रेनेज असेल ते चेक करावे. आणि या सर्व बाबींचा चौकशी अहवाल पुढच्या स्थायी समितीच्या बैठकीत सादर करण्यात यावा.

श्री.मनोज सांगोळेः– मा.सभापती महोदय, 10 झोन अंतर्गत सफाई कर्मचा–यांची इमरजन्सीमध्ये टीम ठेवण्यात आली आहे. पूर्वी दुपारी 2.00 वाजेपासून कर्मचारी झोनमध्ये राहत होते. आता कर्मचारी दुपारनंतर दिसत नाही. ही यंत्रणा कां बंद करण्यात आली. जेणेकरून त्याच्यामार्फत एमरजन्सीमध्ये एखादे गडर भरले असेल, एका ठिकाणी जनावरे मेली असेल तर त्यांच्याकडून उचलता येवू शकते. त्याचबरोबर हेल्थ विभागाकडून दुपारी 2.00 वाजेनंतर सफाई कर्मचारी ठेवण्याची व्यवस्था करण्यात यावी.

डॉ.दासरवारः– मा.सभापती महोदय, इमरजन्सी टीम प्रत्येक झोनमध्ये आहे. दोन शिफ्टमध्ये कर्मचारी देण्यात आले आहे.

श्री.मनोज सांगोळेः– मा.सभापती महोदय, सफाई कर्मचा–यांची दुपारी 2 वाजेनंतर रात्री 9 ते 10 वाजेपर्यंत जी डयुटीची वेळ असेल त्या वेळेत त्यांना झोनमध्ये बसविण्यात यावे. पावसाळयाच्या दिवसात खुप त्रास होणार आहे. त्यामुळे ऐवजदारांसोबत सफाई कर्मचा–यांना सुध्दा बसण्याची व्यवस्था करण्यात यावी.

ठराव क्रमांक 44 :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर